**राज्यातील अल्पसंख्यांक बहुल भागातील विद्यमान तंत्र निकेतनामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून दुसरी पाळी सुरू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

शासन निर्णय क्र. टिईडी-२०१०/(३३४/२०१०)/तांशि-५,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,

दिनांक :१३ सप्टेंबर, २०११.

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मान्यता२००८/(१७/०८)तांशि-६,दि.१४.८.०८.

२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १०/पदविका/व्दि.पा./२०११/३२३,दि. ०४ जुलै २०११

**प्रस्तावना** : जगतिकीकरणामुळे मोठया प्रमाणात औद्योगिकरण होत असून देशात तसेच राज्यातही औद्योगिकरण झपाटयाने होत आहे.अगामी वर्षात राज्यात एकूण लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा विचार करता व्यवसाय शिक्षणाची विद्यमान प्रवेश क्षमता व व्यवसाय शिक्षणाच्या सुविधांचे प्रमाण वाढविणे अत्यंत आवश्यक आहे मा. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेने सन २०२२ पर्यंत देशात ५०० दशलक्ष कुशल मुनुष्यबळाची निर्मिती करण्याचे उद्दीष्ट निश्चित केल्याने तंत्र निकेतनातील प्रवेशक्षमतेत भरीव वाढ करुन अधिकधिक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करणे अनिवार्य ठरते राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील उमेदवारांनाही व्यवसाय शिक्षणाच्या व तदनुषंगाने रोजबार व स्वंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यात येऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे शासनाचे उद्दीष्ट आहे.

राज्यातील ऐकुण ४२ शासकीय तंत्र निकेतनापैकी पहिल्या टप्यात १९ शासकीय तंत्रनिकेतनात १.स्थापत्य अभियांत्रिकी २. यंत्र अभियांत्रिकी ३ इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या अभ्यासक्रमासह प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेसी दुसरी पाळी सुरू करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने दि. ६.५.२०१० रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतला होता.मंत्रीमंडळाच्या निर्णयानूसार दि. १ जुन २०१० च्या शासन निर्णयानूसार सदर संस्थामध्ये दुसरी पाळी सुरू करणे, निकष निश्चिती करणे व पदनिर्मिती (शिक्षकीय) करण्यात आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून शासकीय तंत्र निकेतन अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे व कोल्हापूर या ७ ठिकाणी दुसरी पाळी सुरु करण्यात आलेली आहे.अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील ठाणे, सोलापूर, यवतमाळ, नांदेड, जळगांव, मुंबई व मुंबईउपनगर या ७ शासकीय तंत्र निकेतनात शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्याचा निर्णय अल्पसंख्यांक विकास विभागाने घेतला असून त्यासाठी ऐकुण १५.१८ कोटी ऐवढा नियतव्यय आर्थिक वर्ष २०११-१२ पासून तसेच पुढील वर्षासाठी/प्रत्येक वर्षी आवश्यक नियतव्यय दिला जाईल असे अल्पसंख्यांक विकास विभागाने कळविलेले आहे. त्यामुळे उपरोक्त ७ शासकीय तंत्र निकेतनात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. उक्त बाबींचा सर्वांगिन विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-** उपरोक्त पार्श्वभुमिवर अल्पसंख्यांक समाजातील उमेदवारांना रोजगार व स्वयंमरोजगारांच्या संधी निर्माण होण्यासाठी राज्यातील ठाणे, सोलापूर, यवतमाळ, नांदेड, व जळगांव, या विद्यमान ५ शासकीय तंत्र निकेतनात प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेसह १. स्थापत्य अभियांत्रिकी २. यंत्र अभियांत्रिकी ३ इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या अभ्यासक्रमासह तसेच मुंबई येथील शासकीय मुद्रण तंत्र संस्था येथे प्रिंटींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासह व मुंबईउपनगर येथील शासकीय तंत्रनिकेतनात १. संगणक अभियांत्रिकी २. विद्युत अभियांत्रिकी ३. उपकरणीकरण अभियांत्रिकी या अभ्यासक्रमासह प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेसह दुसरी पाळी शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरू करण्यास खालील अटींच्या अधिन राहुन या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर तंत्र निकेतनामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करावयाची असल्यामुळे त्यासाठी येणारा खर्च रु. १५.१८ कोटी ऐवढा नियतव्यय दरवर्षी अल्पसंख्यांक विकास विभागकडून उच्च वं तंत्र शिक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात येईल व त्याबाबतची सर्व कार्यवाही अल्पसंख्यांक विकास विभागाकडून करण्यात येईल व यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत आवश्यक योजनेची आखणी करण्यात येईल.

२. आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये रु. २.५० कोटी ऐवढा निधी आकस्मीतता निधीमधून अल्पसंख्यांक विकास विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमुद ७ शासकीय तंत्रनिकेतनात अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्यात येईल.

३. तंत्र निकेतनातील प्रवेशाच्या प्रवेशप्रक्रीयेनूसार सदर तंत्रनिकेतनातील दूसऱ्या पाळीची प्रवेशप्रक्रीया राबविण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालया मार्फत कार्यवाही करण्यात येईल.

४. अल्पसंख्यांकासाठी सुरू करावयाच्या सदर दुसऱ्या पाळीसाठी अल्पसंख्यांकासाठी ७० टक्के जागा व सर्व साधारण आणि राखिव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३० टक्के जागा राखुन ठेवण्यात याव्यात ज्या तंत्रनिकेतनामध्ये अल्पसंख्यांक समाजाकरीता मंजुर असलेल्या ७० टक्के कोटयामधून प्रवेशा करीता पुरेशाप्रमाणात उमेदवार उपलब्ध होणार नाहीत अशा रिक्त राहणाऱ्या जागांवर अल्पसंख्यांक समाजेत्तर सर्व साधारण व राखिव प्रवर्गाच्या उमदवारांना प्रवेश देण्यात यावा. सदर प्रवेश प्रचलित प्रवेश नियमावलीतील तरतुदी नूसार करण्यात यावेत.

५. सुरू करावयाच्या सदर दुसऱ्या पाळीसाठी आवश्यक अर्वर्ती व अनावर्ती खर्चाची तरतुद संचालक तंत्र शिक्षण संचालनालय यांनी अल्पसंख्याक विकास विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून वेळोवेळी उपलब्ध करून घ्यावी. अल्पसंख्यांकासाठी सुरू करावयाच्या दुसऱ्या पाळी करीता संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यलयीन खर्च , प्रवास खर्च, शिष्यवृत्ती व विद्यावेतने इत्यादी देयके कोषागारातुन आहरण व संवितरण करण्यासाठी संचालक, तंत्र शिक्षण मुंबई याना नियंत्रक अधिकारी व संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

६. शासनाच्या संदर्भ क्र. १ येथे नमुद केलेल्या शासना निर्णयानूसार निर्माण करण्यात आलेल्या शिक्षकीय पदांच्या माध्यमांतुन सदर दुसऱ्या पाळीचे अभ्यासक्रम पुर्ण करण्यात यावे.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २२८२निव्ही, दि. २४/८/२०११ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४९२/११/व्यय५, दि. २९/८/२०११ अन्वये मिळालेल्या मान्यतेनूसार व अल्पसंख्यांक विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशनूसार व नावाने.

(ज.म.अंबादे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, अमरावती, मुंबई, नाशिक,पुणे,
४. प्राचार्य, संबंधित शासकीय तंत्र निकेतने.

५. महालेखापाल( लेखा परिक्षा)महाराष्ट्र - १/२ मुंबई /नागपूर
६. महालेखापाल( लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र - १/२ मुंबई /नागपूर
७. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
८. मा. मंत्री , उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
९. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.(दोन प्रति)
१३. सर्व सहसचिव/ उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.
१४. अवर सचिव , तांशि ३/ साशि १ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
१५. संबंधित संस्था.

<u>प्रत माहितीसाठी</u> :-

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
३. निवडनस्ती.